वाचले:-

१) मा.अतिरिक्त आयुक्त सो. यांचा दिनांक -२१/०९/२०१९ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
माध्यमिक शिक्षण विभाग
माशि/१/कावि/८१३/२०१९
दि.२१/०९/२०१९

विषय :- माध्यमिक विभागाचे विद्यालयांकरीता तपासणी पथक नेमणेबाबत...

आदेश,

पिंपरी -चिंचवड महानगरपालिका माध्यमिक विभागामार्फत १८ माध्यमिक विद्यालये कार्यरत आहेत.१८ माध्यमिक विद्यालयामध्ये ८६०७ विद्यार्थी शिक्षण घेत असुन.१८ माध्यमिक विद्यालयामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रानुसार विद्यार्थी संख्या कमी दिसुन येत आहे. तसेच मनपा माध्यमिक विद्यालयांचा शिक्षणाचा दर्जा उच्चावण्यासाठी विद्यालयामध्ये विविध उपक्रम राबविणे आवश्यक आहे.या करीता विद्यालय तपासणी विद्यालयाच्या अडचणी समक्ष पाहणे करीता तसेच इतर प्रशासकीय कामकाजात सुधारणा करणे कामी विद्यालयांना भेटी देणे आवश्यक आहे,त्यानुसार विभागाच्या स्तरावर खालील प्रमाणे तपासणी पथक नेमणूक करणेत येत आहे.

१)शिक्षणाधिकारी

२)मुख्याध्यापक / प्र.मुख्याध्यापक

३)कार्यालय अधिक्षक

४)मुख्यलिपिक

५) लिपिक

वरील प्रमाणे विद्यालयातील शैक्षणिक बाबी मुख्याध्यापक किंवा प्र.मुख्याध्यापक हे तपासणी करतील तसेच कार्यालयातील प्रशासकीय बाबी कार्यालय अधिक्षक यांच्या नियत्रंणात मुख्यलिपिक, लिपिक हे तपासणी करतील यामुळे विद्यालयातील प्रशासकीय कामकाजात सुधारणा होईल.

सर्व विद्यालयांनी विद्यार्थी पटसंख्या वाढविणेबाबत बाबत योग्य ती कार्यवाही करणेत यावी,तसेच विद्यालयातील विद्यार्थीच्या सर्व प्रकारच्या शिष्यवृत्या,जि.प.कडील कामकाज,एस.एस.बोर्ड तसेच विद्यालयातील शैक्षणिक तसेच प्रशासकीय कामकाज पुर्ण करणेत यावे.याबाबत हयगय करू नये.तपासणी मध्ये कामकाज अर्पुण आढळल्यास संबंधीतावर नियमानुसार कारवाई करणेत येईल. याची नोंद घ्यावी.

सही/-
अतिरिक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रति,
मुख्याध्यापक /प्र.मुख्याध्यापक
माध्यमिक विद्यालये
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

Scanned by CamScanner